**रे.मु.नं. ८/२०११**

किरण गोखले वि. संदिप मोदी

## <u>आदेश निशाणी १५१ वर</u>

**१.** सदर अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश १ नियम १० नुसार तिऱ्हाईत इसमांना प्रतिवादी म्हणुन सामील करण्यासाठी दाखल केलेला आहे. अर्जात असे नमुद केले आहे की, तिऱ्हाईत इसमांनी या दाव्यातील मिळकतींमधील काही क्षेत्र हस्तांतरीत केल्यामुळे ते तिऱ्हाईत इसम आवश्यक पक्षकार आहेत.

**२.** प्रतिवादी क्र. १० ते १३ यांनी अर्ज मंजुर करण्यात यावा असे लेखी म्हणणे दिले आहे. इतर कोणत्याही प्रतिवादींनी लेखी म्हणणे दिलेले नाही. त्यामुळे त्यांचे लेखी म्हणणे बंद करण्यात येत आहे.

**३.** प्रतिवादी क्र. १ ते ३ यांनी प्रस्तावित प्रतिवादी क्र. २६ ते २९ यांना वाद मिळकतीसंदर्भात खरेदीखत लिहुन दिल्यामुळे ते या दाव्यातील आवश्यक पक्षकार आहेत. म्हणुन मी खालील आदेश पारीत करीत आहे.

## <u>आदेश</u>

**१.** अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

**२.** अर्जात नमूद केल्याप्रमाणे, प्रस्तावित प्रतिवादी क्रमांक २६ ते २९ यांना प्रस्तुत दाव्यात प्रतिवादी म्हणून सामिल करण्यात येत आहे.

**३.** वादी यांनी सदर प्रतिवादींना दाव्यात सामिल करून दुरूस्त दाव्याच्या प्रती वैध मुदतीत दाखल करावयाच्या आहेत.

**४.** दावा दुरूस्त प्रत दिल्यानंतर प्रतिवादी क्रमांक २६ ते २९ यांना दाव्यात हजर राहून कैफियत दाखल करण्याकरीता समन्स काढण्यात यावे.

सासवड.
दिनांक :— २०/०२/२०१९

**( अे.आर.दिंडे )**
सह.दिवाणी न्यायाधीश क.स्तर, सासवड

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this P.D.F. file Judgment are same word for word as per original Judgment.

Name of Steno : M. D. Shirode, Stenographer, (L.G.)

Court Name : Shri. Amit R. Dinde
Judicial Magistrate F.C., Saswad.

Date of Judgment : 20/02/2019

Judgment signed by presiding officer on : 20/02/2019

Judgment uploaded on : 22/02/2019